# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४३/२०११-१२ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. प्रशांत अशोक मोरे<br>मु.पो. देवराष्ट्रे, ता. कडेगांव, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

कोरम : १) श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. प्रशांत अशोक मोरे, मु.पो. देवराष्ट्रे, ता. कडेगांव, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी किर्लोस्करवाडी उप विभाग विटा विभागा विरुध्द तक्रार दि. १९.११.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी नवीन आपली शेती गट क्र. १३५/५ मध्ये वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २.५.२०११ रोजी अर्ज केला. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने या अर्जास दि. १.६.२०११ पर्यंत वीज मंजुरीचे चलन मिळणे आवश्यक होते, तथापि ते मिळाले नाही. तक्रारदाराने दि. २३.८.२०११ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत -
चलन देणेचा आदेश व्हावा, विलंब निश्चित झालेस विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीस आपले लेखी म्हणणे सादर करण्यात मुदत दिली त्यानुसार लेखी अहवाल दाखल केला. त्यामध्ये तक्रारदारचा अर्ज किर्लोस्करवाडी उप विभागात दि. २.५.२०११ रोजी प्राप्त झाला. सदरचा अर्ज शाख कार्यालय मोहिते वडगांवास दि. ५.५.२०११ रोजी पाठविण्यात आला. सदरचे शाखा अधिकारी श्री. गुरव यांचेकडे दि. २९.५.२०११ पर्यंत पदभार होता. तसेच श्री. तांबोळी हे बदली होऊन दि. २९.५.२०११ रोजी मोहिते वडगांव शाखा कार्यालय येथे हजर झाले. सदर काळात पायाभूत आराखडामध्ये चालू असणाऱ्या नवीन रोहित्र उभारणीच्या कामामुळे तसेच कृषी संजीवनी योजनेच्या वसुली कामामुळ सदरचे अंदाजपत्रक दि.२२.९.२०११ रोजी पुढील कार्यवाही किर्लोस्करवाडी उप विभाग येथे सादर केले. अर्जदारास दि. २.१२.२०११ रोजी कोटेशन रु. ४६८३/- पोष्टाने पाठविणेत आले ते अर्जदार ग्राहकाने दि.१६.१२.२०११ रोजी भरले असे नमूद केले आहे.

प्रस्तुतची तक्रार सुनावणीसाठी दि. २७.१२.२०११ ऐवजी दि. २८.१२.२०११ रोजी घेतली. तक्रारदार गैरहजर. वितरण कंपनीतर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता श्री. व्हनमाने उपस्थित. त्यांनी २ पोलचे काम आहे, चलन दिले आहे, ग्राहकाने चाचणी अहवाल दिलेला नाही असे सांगितले. वि.प.ने मंचाला अग्रेषित केलेल्या दि. ३१.१२.२०११ च्या पत्रात सदर ग्राहकाचे दोन पोल लघुदाब वाहिनीचे काम दि. २९.१२.२०११ रोजी पूर्ण करण्यात आले आहे, चाचणी अहवाल दिलेला नाही त्यासाठी दि. ३१.१२.२०११ ला नोटीस देण्यात आलेली आहे. श्री. व्हनमाने यांनी ग्राहक भरपाई नको असल्याबाबतचे पत्र देण्यास तयार आहे त्यासाठी मुदत द्यावी असे मंचासमोर सांगितले, परंतु दि. ३१.१२.२०११ च्या म्हणण्या सोबत ग्राहकाची भरपाई नको असल्याचे पत्र दाखल केले नाही. वि.प.ने चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित कनेक्शन देण्यात येईल, ग्राहकाच्या चलन विलंबाबद्दल भरपाईची माफी मिळावी अशी मागणी केली आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी मागितलेली भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

२) होय

आदेश ?

खालील प्रमाणे

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

कारणमिमांसा

ग्राहकाचा शेतीपंपास नवीन वीज जोडणी मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर वितरण वाहिनी विस्तार असल्याने त्यांस कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार १ महिन्यात चलन देणे आवश्यक होते ते विलंबाने दिले हे स्पष्ट आहे. वि.प.ने विलंब हा शाखा अधिकारी बदलून गेले, इतर कामांमुळे झाला असे म्हटले आहे. कृती मानके विनियम २००५ मधील ११.२ नुसार विलंब माफीसाठी वि.प.ने कुठलीही कार्यवाही केली नाही. असे असले तरी, वि.प.ने २ पोल उभे करुन वाहिनीचे काम पूर्ण केले असून ग्राहकाचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर वीज जोडणी देण्याची तयारी दर्शविली आहे. वितरण कंपनीने ग्राहकास चलन विलंबापोटी भरपाई नको असे ग्राहकाचे लेखी पत्र देण्यासाठी मुदत घेतली परंतु अद्याप ते मंचासमोर दाखल केले नाही. या ठिकाणी अर्जदार ग्राहकास चलन देण्यास विलंब झाला आहे आणि विलंब माफीसाठी वि.प.ने दिलेली कारणे पुरेसे नाहीत असे मंचाचे मत आहे. ग्राहकास वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिन्यात चलन देणे आवश्यक होते ते १ जूनला न देता २ डिसेंबरला पोष्टाने ग्राहकास पाठविले आहे. त्यामुळे चलन देण्यास ६ महिन्यांचा विलंब झाला आहे. त्यामुळे ग्राहकाची भरपाईची मागणी मंजूर करणे योग्य होईल. कृती मानके विनियम २००५ व त्यासोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणे अर्जदार ग्राहकास प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे २४ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. २४००/- भरपाई ग्राहकास देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

या ठिकाणी वि.प.ने ग्राहकाने चलनाचे पैसे दि.१६.१२.२०११ रोजी भरले आहेत, त्वरित वीज कनेक्शन देण्यात येईल असे दि. ३१.१२.२०११ च्या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे या तक्रारीतील ग्राहकाच्या विलंबपोटी भरपाई मिळवी या मागणीस बाधा येत नाही. अर्थात ग्राहक वीज जोडणी झाल्यानंतर स्वखुशीने भरपाई नको अशी लेखी संमत्ती देऊ शकतो / कळवू शकतो. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी उप विभाग किर्लोस्करवाडी, विभाग विटा यांनी ग्राहकास १ जून ते १ डिसेंबर या ६ महिन्याच्या म्हणजे २४ आठवड्यांच्या चलन विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु.२४००/- अर्जदारा ग्राहकास द्यावेत. सदर रकमेचे समायोजन २ बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी, तसा अहवाल मचांस द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com